# // प्रेस नोट //

## राष्ट्रीय जंतनाशक दिवस

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात १३ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त मोहिम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचे सार्वजनिक आरोग्य विभागाने सुक्ष्म नियोजन करुन प्रत्येक पात्र लाभार्थ्याला जंतनाशकच्या गोळया देऊन मोहीम यशस्वीरीत्या राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेत महापालिकेच्या कार्यक्षेत्रात १ ते १९ वयोगटातील ९६००० मुला-मुलींना जंतनाशक गोळया देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय जंतनाशक दिन (एन.डी.डी) हा कार्यक्रम मुले व पौगंडावस्तेतील मुला-मुलींसाठी जंताच्या आजाराचा सामना करण्यासाठी फेब्रुवारी २०१५ मध्ये सुरु करण्यात आला आहे. राष्ट्रीय जंतनाशक दिन (एन.डी.डी) हा कार्यक्रम फेब्रुवारी आणि ऑगस्ट महिन्यात शाळा आणि अंगणवाडीमध्ये एकाच निश्चित दिवशी जंतनाशक गोळया देऊन वर्षातुन दोनदा घेण्यात येतो.

**उद्देश :-**

राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उददेश हा १-१९ वर्षे वयोगटातील सर्व मुला- मुलींना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे.

राष्ट्रीय जंतनाशक मोहिम अंमलबजावणी वेळापत्रक

अ ) मोहिमेची तारीख

१) १३ फेब्रुवारी २०२४ - राष्ट्रीय जंतनाशक दिन

२) २० फेब्रुवारी २०२४ - मॉप अप दिन

ब) लाभार्थी :-

- १ ते ६ वर्षे वयोगटातील सर्व बालके.
- १ ते ५ वी तील (६ ते १० वर्षे वयोगटातील) सर्व शाळेत जाणारे मुले - मुली
- ६ ते १२ वी तील (१० ते १९ वर्षे वयोगटातील) सर्व शाळेत जाणारे मुले - मुली
- ६ ते १९ वयोगटातील शालाबाहय सर्व मुले - मुली .

या मोहिमेमुळे मुला - मुलींचा शारीरीक, मानसिक व बौध्दिक विकास होण्यास मदत होते. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी आरोग्य संस्था, संबंधित अंगणवाडया, शाळा, कॉलेजमध्ये आशा स्वयंसेविका, अंगणवाडीसेविका, शिक्षक व आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. तरी सदर मोहिम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी नागरिकांनी जास्तीजास्त सहकार्य करावे असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त यांच्या मार्फत जनतेस करण्यात येत आहे.

**(डॉ. बी. टी. दुधभाते)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\29-05-20023 D Drive Data\R C H\Vit A & Jant Nashak\NDD\2024\Press note .docx